N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस निरीक्षक खेड पोलीस स्टेशन सत्यमेव जयते पुणे ग्रामीण

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** खेड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0262 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 09/05/2026 07:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिंनाक पासून):** 08/05/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 08/05/2026

**Time From (वेळेपासून):** 11:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 09/05/2026 **Time (वेळ):** 06:36 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 012

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 09/05/2026 06:36 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 8 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** निमगाव खंडोबा ,येथिल ग्राम महसुल कार्यालय, मौजे निमगाव ता खेड जि पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीमती शैलजा शशिकांत शिंदे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नेमणुक ला प्र वि पुणे,राठीए 102,विंडसरपार्क,माऊलीचौक,दत्तमंदीर रोड, वाकड,पुणे411057,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नेमणुक ला प्र वि पुणे,राठीए 102,विंडसरपार्क,माऊलीचौक,दत्तमंदीर रोड, वाकड,पुणे411057,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7722011255

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेविका मनिषा माने पद ग्राम महसुल अधिकारी नेमणुक ग्राममहसुल अधिकारी | | | 1. सजा निमगाव तलाठी कार्यालय ,रा 107उमादर्शन सोसायटीवाडा रोड,राजगुरुनगर खेड ता खेड जि पुणे ,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | लोकसेवक दत्तात्रय छबु चव्हाण पद महसुल सेवक नेम | | | 1. खरपुडी बु ता खेड जि पुणे,खेड, पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |



Scanned with CamScanner

निरीक्षक खेड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण सत्यमेव जयते

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | निमगाव तलाठी कार्यालय | | | | |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि. 09/05/2026

मी श्रीमती शैलजा शशिकांत शिंदे, वय- 39 वर्षे, व्यवसाय -नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे रा.ठी. ए 102, विंडसर पार्क, माऊली चौक, दत्तमंदीर रोड, वाकड, पुणे 411057 मो. 7722011255.

आज रोजी समक्ष हजर राहून फिर्याद देते की, आम्ही दि. 07/05/2026 रोजी 14.00 वा. आमचे ला.प्र.वि. पुणे कार्यालयात,हजर असताना पोलीस उप अधीक्षक श्री सतीश वाळके यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्री. गणेश मुरलीधर चौधरी यांचे सोबत ओळख करुन देऊन त्यांची लाचेची तक्रार आहे. आपण पुढील कारवाई करावी अशी सूचना केली. तसेच सदर कारवाई कामी मदती करीता पोकॉ/9843 महामुलकर, म पो शि 2652/ कोमल शेटे व चालक पो.शि./4337 कदम यांचे ताब्यातील शासकिय वाहन इरटिगा एम एच 12 युसी 4109 असे मदतीकरीता घेण्यास सांगीतले. तसेच सदर कारवाईसाठी दोन शासकीय पंच मिळणेकामी पुणे महानगरपालिका येथे पत्रव्यवहार केला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षामध्ये घेवुन गेलो. तेथे त्यांना त्यांचे पुर्ण नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.गणेश मुरलीधर चौधरी,वय-34 वर्षे, व्यवसाय -खाजगी नोकरी, सध्या रा. मु-खरपुडी, पो रेटवडी, ता खेड, जि पुणे मो. नं. 8888297625 असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचेशी आम्ही त्यांचे तक्रारीबाबत चर्चा केली असता तक्रारदार यांनी तलाठी ऑफीस, खरपुडी बु॰, ता. खेड, जि. पुणे येथील तलाठी (ग्राम महसुल अधिकरी)श्रीमती मनिषा माने व शिपाई (कोतवाल) दत्ता यांचेविरुद्ध लाचेची तक्रार असल्याचे सांगीतले व तक्रारदार चौधरी यांना लिहता वाचता येत नसल्याने आम्ही त्यांचे सांगणेप्रमाणे सदरची तक्रार संगणकावर टंकलिखीत केली ती पुढीलप्रमाणे.

"मी अर्जदार श्री. गणेश मुरलीधर चौधरी,वय-34 वर्षे, काम -नोकरी , रा. मु-खरपुडी बु, पो रेटवडी, ता खेड, जि पुणे मो. नं. 8888297625 या ठिकाणी माझे जन्मापासुन माझा भाऊ दत्तात्रय वय 43 वर्षे , त्याची पत्नी यशश्री वय 40 वर्षे त्यांची दोन मुले यांचेसह राहणेस आहे. माझी बहिण नामे कविता दिपक साबळे वय 45 वर्षे हि विवाहित असुन ती साबळेवाडी बहुळ, ता खेड जि पुणे येथे तिचे पतीसोबत रहावयास आहे. माझे वडील मुरलीधर गुलाब चौधरी यांचे दिंनाक 25/09/2024 रोजी ह्रदयविकारामुळे निधन झाले. माझी आई वत्सला मुरलीधर चौधरी यांचे दिंनाक 01/03/2024 रोजी किडनीचे आजाराने निधन झाले. मी लोरियल कंपनी, एम आय डी सी चाकण, ता खेड, जि पुणे येथे हेल्पर या पदावर नोकरीस आहे.

माझे वडील नामे मुरलीधर गुलाब चौधरी व त्याचे त्यांचे भाऊ अरुण चौधरी अशो चौधरी, संजय चौधरी, त्यांची बहिण नामे सुमन गोपाळ साबळे, कल्पना बन्सीलाल धुमाळ, सिंधु दशरथ साबळे यांची एकत्रित वडीलोपार्जि खरपुडी बु येथे गट क्रमांक व उपविभाग 792 भोगवाटा वर्ग 1 क्षेत्र 0.38.00 हे आर. चौ मी जिरायत ज



Scanned with CamScanner

सदर जमीनीची अदयापपर्यत खातेफोड झाली नाही.
माझे वडील मयत झाल्याने सदर जमीनीवर माझी स्वत:ची तसेच भाऊ दत्तात्रय व बहिण कविता हिची वारस नोंद करण्याकरता मी तलाठी ऑफीस, खरपुडी बु, ता. खेड, जि. पुणे येथे दिंनाक 6 मार्च 2026 रोजी गेलो असता तेथे नेमणुकीस असलेल्या तलाठी मनीषा माने यांना मी वारसनोंदीबाबतचा लेखी अर्ज दिला व त्यांची पोहोच मागतली असता त्यांनी देण्यास नकार दिला. त्यानंतर मी दिंनाक 28/03/2026 रोजी त्यांना माझे मोबाईल क्र 8888297625 यावरुन त्यांचे मोबाईल क्र 8956912977 यावर सकाळी 11:17 वाजता कॉल केला व वारसनोंदीविषयी विचारणा केली असता त्यांनी मला इऑफीसला येवुन चौकशी करा। असे सांगितले. त्यानंतर त्याच दिवशी मी ऑफीसला गेलो असता, त्यांनी मला माझे कागदपत्रावर सरपंच व पोलीस पाटील यांची सही नसल्याचे सांगितले. त्यावेळी मी माझा अर्ज व कागदपत्र परत घेवुन आलो. सदर कागदपत्रांवर सरपंच व पोलीस पाटील यांचा सही शिक्का घेवुन सोबत वारसनोंदीबाबतचा लेखी अर्ज घेवुन दिंनाक 30/04/2026 रोजी सकाळी 12:04 वाजता मी पुन्हा माने मॅडम यांना त्यांचे वर नमुद मोबाईलवर कॉल करुन त्यांचे ऑफीसला गेलो. माने मॅडम यांना मी माझा वारसनोंदीचा लेखी अर्ज व कागदपत्र ठेवुन घेतले, परंतु माझे अर्जाची पोहोच मला दिली नाही. त्यावेळी त्यांचेसोबत शिपाई दत्ता यास माने मॅडम यांनी माझेकडे बोट दाखवुन यांचेकडुन पैसे घ्या असे सांगितले. त्यानंतर मी आज दिंनाक 07/05/2026 रोजी सकाळी 09:30 वाजताचे सुमारास दत्ता यास त्याचे मोबाईल क्र 7559455641 वर कॉल करुन त्याचे राहते घरी मांडवळा वस्ती, खरपुडे बु ता खेड जि पुणे येथे गेलो असता, त्यांनी मला वारसनोंदीसाठी 6000/- रुपयांची मागणी करुन उदया सकाळी दिंनाक 08/05/2026 रोजी त्यांचे कार्यालयात बोलविले आहे.
व्यक्ती मयत झाल्यानंतर त्याचे वारसनोंद करण्याकरीता 3 महिन्याचा कालावधी होवुन गेल्यास वारसनोंदीकरीता रु 15/- अशी शासकीय फी असल्याचे मला माहित आहे. त्यामुळे खरपुडी बु चे तलाठी माने मॅडम यांच्या तर्फे त्यांचे शिपाई दत्ता यांनी मागितलेली 6000/- रुपये ही लाच असल्याची माझी खात्री झाली. त्यामूळे खरपुडे बुद्रुकचे तलाठी श्रीमती मनिषा माने यांनी त्याचा शिपाई दत्ता याचेमार्फतीने वारसनोंदीकरीता मागितलेली 6000/- रुपये लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी आज दि. 07/05/2026 रोजी  खरपुडी बु तलाठी कार्यालयात न जाता तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे आलो आहे.
माझे आणि तलाठी श्रीमती मनिषा माने व शिपाई दत्ता यांचेत कोणतेही पुर्ववैमनस्य तसेच आर्थिक देवाण घेवाण किंवा उसणवारी नाही. तरी श्रीमती मनिषा माने, तलाठी खरपुडे बु, ता खेड, जि पुणे यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई होणेस विंनती आहे. मला मराठी लिहीता व वाचता येत नसल्याने माझा अर्ज श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे यांनी मी सांगितल्याप्रमाणे मराठीमध्ये संगणकावर टाईप केला असुन त्याची प्रिंट काढल्यावर मला वाचुन दाखविले असता माझ्े सांगणेप्रमाणे तो बरोबर व खरा आहे." वगैरे मजकुरची तक्रार लिहुन दिली.
त्यानंतर 18:30 वाजताचे सुमारास दोन पंच आमचे कक्षात हजर झाले त्यांची नावे पंच श्री सुभाष विश्वनाथ शिंदे वय 48 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, प्राथमिक शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका  रा ठि- फलॅट न- ए/304, श्री लक्ष्मी इन्क्रेव्ह सोसायटी, हडपसर पुणे व पंच श्रीमती तेजस्वीनी विनोद गदादे, वय 44 वर्षे ,व्यवसाय- नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, मुख्यलेखा वित्त विभाग, पुणे महानगरपालिका अशी असुन सदर तक्रारीचे अनुषंगाने कारवाईकामी त्यांची नेमणुक केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांची व तक्रारदार व पंचाची ओळख करुन दिली व ओळख करुन घेतली.  तक्रारदार यांनी पंचांना प्रथम तोंडी तक्रार कथन केली. व त्यानंतर आम्ही संणकावर टाईप केलेली तक्रार एकच असल्याची खात्री करुन सदर तक्रारीवर पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन सही केली. लोकसेवक दत्ता यांनी तक्रारदार यांना दिंनाक 08/05/2026 रोजी बोलविल्याने सदर तक्रारीवर पुढील कारवाई म्हणजे पडताळणी हि दिंनाक 08/05/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविले.
दिंनाक 08/05/2026 रोजी सकाळी 8.15 वाजता पडताळणी कारवाई करण्यासाठी लाप्रवि कार्यालय, पुणे येथे आम्ही स्वत:, पंच व पडताळणी पथक आमच्या कक्षामध्ये उपस्थित होतो. सकाळी 08.30 वाजता सापळा कारवाई साठी लागणारे सर्व आवश्यक असणारे साहित्य लॅपटॉप प्रिंटर, काळा कपडा, लाखी, पितळी सिल, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायोलेट बॅटरी, शासकीय व्हॉईस रेकॉर्डर, शासकीय व्हिडीओ रेकॉर्डर, 02 मेमरी कार्ड व इतर आवश्यक स्टेशनरी साहित्य घेवून ला प्र वि कार्यालय, पुणे येथून पो.शि. कदम यांचे ताब्यातील शासकीय वाहन इरटिगा क्रमांक एमएच/12/यूसी/4109 यामध्ये ठेऊन आम्ही, पंच व सापळा पथक रवाना झालो.
आम्ही साधु वासवाणी चौक - वाकडेवाडी- नाशिकफाटा, भोसरी, चाकण मार्गे खेड येथील नाशिक खेड बायपास रोडवरील हॉटेल चतुर्थीच्या अलिकडील रोडलगत असणा-या मोकळया जागेमध्ये 10:20 वाजताचे सुमारास पोहचलो. दिंनाक 07/05/2026 रोजीच्या दिलेल्या सूचनेप्रमाणे व ठरविल्याप्रमाणे तक्रारदार गणेश चौधरी हे



Scanned with CamScanner

त्यांची दुचाकी क्र एम एच 14 के ई 1985 या पांढ-या रंगाच्या अॅक्टीव्हा सह तेथे हजर होते. त्यानंतर तक्रारदार यांना आमचे शासकीय वाहनात घेवुन तक्रारदार यांचे लाचेच्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात येणा-या पडताळणी कारवाईसाठी आम्ही तक्रारदार व पंच यांना आमचे कडील व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ कॅमेरा दाखवुन सदर व्हाईस रेकॉर्ड मध्ये 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे नवीन मेमरी कार्ड टाकले व व्हिडीओ कॅमे-यामध्ये 8 जीबी क्षमतेचे के.डी.एम.कंपनीचे नवीन मेमरीकार्ड टाकले. त्याचे वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर 11/22 वाजता व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ कॅमेरा सुरु करुन सापळा अधिकारी म्हणुन आमचे, तक्रारदार श्री. गणेश चौधरी, पंच क्र.1 श्री. सुभाष शिंदे , पंच क्र. 2 श्रीमती तेजस्वीनी गदादे यांची निवेदने ध्वनिमुद्रीत केली. त्यानंतर व्हिडीओ कॅमेरा व शासकीय व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. ती वेळ 11:30 वाजताची होती.
लोकसेवक दत्ता हे तक्रारदार चौधरी यांचेकडे मागणी करत असलेल्या लाचेच्या संदर्भात पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक सूचना देवून तक्रारदार श्री चौधरी व पंच क्र.1 श्री. शिंदे यांना तक्रारदार यांचेकडील दुचाकी होंडा अॅक्टीव्हा क्रमांक एम एच 14 के ई 1985 यावरुन तलाठी कार्यालय खरपुडी बु॰, ता खेड राजगुरुनगर जि पुणे येथे पडताळणी कारवाई कामी पाठविण्याचे ठरवण्यात आले.
त्यानंतर आमचे सांगणेवरुन पोलीस शिपाई श्री.महामुलकर यांनी तक्रारदार श्री.चौधरी यांचे शर्टच्या आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावुन तो चालु करुन पडताळणीसाठी पंच क्र.1 श्री. शिंदे यांचेसोबत तक्रारदार यांचे दुचाकी वाहन क्र. होंडा अॅक्टीव्हा एम एच 14 के ई 1985 यावरुन रवाना केले . ती वेळ 11.40 वा.ची होती. उर्वरित सापळा पथक हे खेड येथील नाशिक खेड बायपास रोडवरील हॉटेल चतुर्थीच्या अलिकडील रोडलगत असणा-या मोकळया जागेमध्ये थांबून राहिले. तक्रारदार व पंच क्र 1 हे 12:25 वाजताचे सुमारास आम्ही थांबलो होतो त्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आमचे सांगणेवरुन पोलीस शिपाई महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 श्री. शिंदे यांना गेल्यापासून येईपर्यंत काय झाले असे विचारले असता, त्यांनी सांगीतले की, "मी व तक्रारदार असे त्यांचे दुचाकी वाहनावर तलाठी कार्यालय खरपुडी बु ता खेड राजगुरुनगर येथे गेलो असता सदर ठिकाणी चारही बाजुने पत्रा असलेले तलाठी कार्यालय होते व तेथे एक वयस्कर व्यक्ती उपस्थित होते. तक्रारदार यांनी माझे समक्ष त्यांना ऑफीसचे बाहेर बोलविले व तक्रारदार हे लोकसेवक श्री दत्ता यांचेसोबत त्यांनी दिंनाक 07/05/2026 रोजी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत बोलु लागले. त्यावेळी लोकसेवक दत्ता यंानी तक्रारदार यांना लाचेची रक्कम किती दयायची याबाबत स्पष्ट सांगीतले नाही. तसेच तक्रारदार यांचे वारसनांेदीच्या प्रलंबित कामाचे अनुषंगाने कोणतीही चर्चा केली नसल्याचे सांगितले. त्यावेळी कार्यालयामध्ये ग्राममहसुल अधिकारी /तलाठी मनिषा माने हजर असल्याचे सांगितले. परंतु तक्रारदार यांनी त्यांचेकडेही कामाचे अनुषंगाने व पैशाचे अनुषंगाने कोणतेही बोलणे केले नसल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. चौधरी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनीही वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. तसेच आम्ही व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता वरील प्रमाणे प्रलंबीत काम व लाचेच्या रक्कमेबाबत स्पष्टता निष्पन्न झाली नाही. त्याबाबत झालेले संभाषण सविस्तर पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे."
लाच मागणी पडताळणी वेळी प्रलंबित वारसनोंदीबाबत कोणतीही चर्चा न झाल्याने तसेच लाच रकमेच्या ठराविक रकमेबाबत स्पष्टता नसल्याने व सदरवेळी लोकसेविका श्रीमती माने यांचेकडे पडताळणी न झाल्याने लाच मागणी पडताळणी पुन्हा करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले फिर्यादी जबाब दि. 09/05/2026

मी श्रीमती शैलजा शशिकांत शिंदे, वय- 39 वर्षे, व्यवसाय –नोकरी, पोलीस निरीक्षक, नेमणूक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे रा.ठी. ए 102, विंडसर पार्क, माऊली चौक, दत्तमंदीर रोड, वाकड, पुणे 411057 मो. 7722011255.
आज रोजी समक्ष हजर राहून फिंयाद देते की, आम्ही दि. 07/05/2026 रोजी 14.00 वा. आमचे ला.प्र.वि. पुणे कार्यालयात,हजर असताना पोलीस उप अधीक्षक श्री सतीश वाळके यांनी आम्हाला त्यांचे कक्षात बोलावून सदर ठिकाणी हजर असलेले तक्रारदार श्री. गणेश मुरलीधर चौधरी यांचे सोबत ओळख करुन देऊन त्यांची लाचेची तक्रार आहे. आपण पुढील कारवाई करावी अशी सूचना केली. तसेच सदर कारवाई कामी मदती करीता पोकॉ/9843 महामुलकर, म पो शि 2652/ कोमल शेटे व चालक पो.शि./4337 कदम यांचे ताब्यातील शासकिय वाहन इरटिगा एम एच 12 युसी 4109 असे मदतीकरीता घेण्यास सांगीतले. तसेच सदर कारवाईसाठी दोन शासकीय पंच मिळणेकामी पुणे महानगरपालिका येथे पत्रव्यवहार केला.
त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे कक्षामध्ये घेवुन गेलो. तेथे त्यांना त्यांचे पुर्ण नांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.गणेश मुरलीधर चौधरी,वय-34 वर्षे, व्यवसाय –खाजगी नोकरी, सध्या रा. मु-खरपुडी, पो रेटवडी, ता खेड, जि पुणे मो. नं. 8888297625 असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांचेशी आम्ही त्यांचे तक्रारीबाबत चर्चा



Scanned with CamScanner

केली असता तक्रारदार यांनी तलाठी ऑफीस, खरपुडी बु॰, ता. खेड, जि. पुणे येथील तलाठी (ग्राम महसुल अधिकरी)श्रीमती मनिषा माने व शिपाई (कोतवाल) दत्ता यांचेविरुद्ध लाचेची तक्रार असल्याचे सांगीतले व तक्रारदार चौधरी यांना लिहता वाचता येत नसल्याने आम्ही त्यंाचे सांगणेप्रमाणे सदरची तक्रार संगणकावर टंकलिखीत केली ती पुढीलप्रमाणे.

"मी अर्जदार श्री. गणेश मुरलीधर चौधरी,वय-34 वर्षे, काम –नोकरी , रा. मु-खरपुडी बु, पो रेटवडी, ता खेड, जि पुणे मो. नं. 8888297625 या ठिकाणी माझे जन्मापासुन माझा भाऊ दत्तात्रय वय 43 वर्षे , त्याची पत्नी यशश्री वय 40 वर्षे त्यांची दोन मुले यांचेसह राहणेस आहे. माझी बहिण नामे कविता दिपक साबळे वय 45 वर्षे हि विवाहित असुन ती साबळेवाडी बहुळ, ता खेड जि पुणे येथे तिचे पतीसोबत रहावयास आहे. माझे वडील मुरलीधर गुलाब चौधरी यांचे दिंनाक 25/09/2024 रोजी हृदयविकारामुळे निधन झाले. माझी आई वत्सला मुरलीधर चौधरी यांचे दिंनाक 01/03/2024 रोजी किडनीचे आजाराने निधन झाले. मी लोरियल कंपनी, एम आय डी सी चाकण, ता खेड, जि पुणे येथे हेल्पर या पदावर नोकरीस आहे.

माझे वडील नामे मुरलीधर गुलाब चौधरी व त्याचे त्यांचे भाऊ अरुण चौधरी अशो चौधरी, संजय चौधरी, त्यंाची बहिण नामे सुमन गोपाळ साबळे, कल्पना बन्सीलाल धुमाळ, सिंधु दशरथ साबळे यांची एकत्रित वडीलोपार्जित खरपुडी बु येथे गट क्रमांक व उपविभाग 792 भोगवाटा वर्ग 1 क्षेत्र 0.38.00 हे आर. चौ मी जिरायत जमीन आहे. सदर जमीनीची अदयापपर्यत खातेफोड झाली नाही.

माझे वडील मयत झाल्याने सदर जमीनीवर माझी स्वत:ची तसेच भाऊ दत्तात्रय व बहिण कविता हिची वारस नोंद करण्याकरता मी तलाठी ऑफीस, खरपुडी बु॰, ता. खेड, जि. पुणे येथे दिंनाक 6 मार्च 2026 रोजी गेलो असता तेथे नेमणुकीस असलेल्या तलाठी मनीषा माने यांना मी वारसनोंदीबाबतचा लेखी अर्ज दिला व त्यांची पोहोच मागतली असता त्यांनी देण्यास नकार दिला. त्यानंतर मी दिंनाक 28/03/2026 रोजी त्यांना माझे मोबाईल क्र 8888297625 यावरुन त्यांचे मोबाईल क्र 8956912977 यावर सकाळी 11:17 वाजता कॉल केला व वारसनांेदीविषयी विचारणा केली असता त्यांनी मला द्दऑफीसला येवुन चौकशी करा। असे सांगितले. त्यानंतर त्याच दिवशी मी ऑफीसला गेलो असता, त्यांनी मला माझे कागदपत्रावर सरपंच व पोलीस पाटील यांची सही नसल्याचे सांगितले. त्यावेळी मी माझा अर्ज व कागदपत्र परत घेवुन आलो. सदर कागदपत्रांवर सरपंच व पोलीस पाटील यांचा सही शिक्का घेवुन सोबत वारसनोंदीबाबतचा लेखी अर्ज घेवुन दिनंाक 30/04/2026 रोजी सकाळी 12:04 वाजता मी पुन्हा माने मॅडम यांना त्यांचे वर नमुद मोबाईलवर कॉल करुन त्यांचे ऑफीसला गेलो. माने मॅडम यांना मी माझा वारसनोंदीचा लेखी अर्ज व कागदपत्र ठेवुन घेतले, परंतु माझे अर्जाची पोहोच मला दिली नाही. त्यावेळी त्यांचेसोबत शिपाई दत्ता यास माने मॅडम यांनी माझेकडे बोट दाखवुन यांचेकडुन पैसे घ्या असे सांगितले. त्यानंतर मी आज दिंनाक 07/05/2026 रोजी सकाळी 09:30 वाजताचे सुमारास दत्ता यास त्याचे मोबाईल क्र 7559455641 वर कॉल करुन त्याचे राहते घरी मांडवळा वस्ती, खरपुडे बु ता खेड जि पुणे येथे गेलो असता, त्यांनी मला वारसनोंदीसाठी 6000/- रुपयांची मागणी करुन उदया सकाळी दिंनाक 08/05/2026 रोजी त्यांचे कार्यालयात बोलविले आहे.

व्यक्ती मयत झाल्यानंतर त्याचे वारसनोंद करण्याकरीता 3 महिन्याचा कालावधी होवुन गेल्यास वारसनांेदीकरीता रु 15/- अशी शासकीय फी असल्याचे मला माहित आहे. त्यामुळे खरपुडी बु चे तलाठी माने मॅडम यांच्या तर्फे त्यांचे शिपाई दत्ता यांनी मागितलेली 6000/- रुपये ही लाच असल्याची माझी खात्री झाली. त्यामूळे खरपुडे बुद्रुकचे तलाठी श्रीमती मनिषा माने यांनी त्याचा शिपाई दत्ता याचेमार्फतीने वारसनोंदीकरीता मागितलेली 6000/- रुपये लाचेची रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी आज दि. 07/05/2026 रोजी खरपुडी बु॰ तलाठी कार्यालयात न जाता तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे येथे आलो आहे.

माझे आणि तलाठी श्रीमती मनिषा माने व शिपाई दत्ता यांचेत कोणतेही पुर्ववैमनस्य तसेच आर्थिक देवाण घेवाण किंवा उसणवारी नाही. तरी श्रीमती मनिषा माने, तलाठी खरपुडे बु॰, ता खेड, जि पुणे यांचेविरुद्ध कायदेशीर कारवाई होणेस विंनती आहे. मला मराठी लिहीता व वाचता येत नसल्याने माझा अर्ज श्रीमती शैलजा शिंदे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे यांनी मी सांगितल्याप्रमाणे मराठीमध्ये संगणकावर टाईप केला असुन त्याची पिंंरट काढल्यावर मला वाचुन दाखविले असता माझ्े सांगणेप्रमाणे तो बरोबर व खरा आहे." वगैरे मजकुरची तक्रार लिहुन दिली.

त्यानतर 18:30 वाजताचे सुमारास दोन पंच आमचे कक्षात हजर झाले त्यांची नावे पंच श्री सुभाष वि·ानाथ शिंदे वय 48 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, प्राथमिक शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका रा ठि- फलॅट न- ए/304, श्री लक्ष्मी इन्क्लेव्ह सोसायटी, हडपसर पुणे व पंच श्रीमती तेजस्वीनी विनोद गदादे, वय 44 वर्षे ,व्यवसाय- नोकरी, पद- वरिष्ठ लिपीक, मुख्यलेखा वित्त विभाग, पुणे महानगरपालिका अशी असुन सदर तक्रारीचे अनुषंगाने



Scanned with CamScanner

कारवाईकामी त्यांची नेमणुक केल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांची व तक्रारदार व पंचाची ओळख करुन दिली व ओळख करुन घेतली. तक्रारदार यांनी पंचांना प्रथम तोंडी तक्रार कथन केली. व त्यानंतर आम्ही संणकावर टाईप केलेली तक्रार एकच असल्याची खात्री करुन सदर तक्रारीवर पंचांनी व आम्ही समक्ष म्हणुन सही केली. लोकसेवक दत्ता यांनी तक्रारदार यांना दिनाक 08/05/2026 रोजी बोलविल्याने सदर तक्रारीवर पुढील कारवाई म्हणजे पडताळणी हि दिनाक 08/05/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविले.

दिनाक 08/05/2026 रोजी सकाळी 8.15 वाजता पडताळणी कारवाई करण्यासाठी लाप्रवि कार्यालय, पुणे येथे आम्ही स्वत:, पंच व पडताळणी पथक आमच्या कक्षामध्ये उपस्थित होतो. सकाळी 08.30 वाजता सापळा कारवाई साठी लागणारे सर्व आवश्यक असणारे साहित्य लॅपटॉप पिं्रटर, काळा कपडा, लाखी, पितळी सिल, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायोलेट बॅटरी, शासकीय व्हॉईस रेकॉर्डर, शासकीय व्हिडीओ रेकॉर्डर, 02 मेमरी कार्ड व इतर आवश्यक स्टेशनरी साहित्य घेवून ला प्र वि कार्यालय, पुणे येथून पो.शि. कदम यांचे ताब्यातील शासकीय वाहन इरटिगा क्रमांक एमएच/12/यूसी/4109 यामध्ये ठेऊन आम्ही, पंच व सापळा पथक रवाना झालो.
आम्ही साधु वासवाणी चौक - वाकडेवाडी- नाशिकफाटा, भोसरी, चाकण मार्गे खेड येथील नाशिक खेड बायपास रोडवरील हॉटेल चतुर्थीच्या अलिकडील रोडलगत असणा-या मोकळया जागेमध्ये 10:20 वाजताचे सुमारास पोहचलो. दिंनाक 07/05/2026 रोजीच्या दिलेल्या सूचनेप्रमाणे व ठरविल्याप्रमाणे तक्रारदार गणेश चौधरी हे त्यांची दुचाकी क्र एम एच 14 के ई 1985 या पांढ-या रंगाच्या अॅक्टीव्हा सह तेथे हजर होते. त्यानंतर तक्रारदार यांना आमचे शासकीय वाहनात घेवुन तक्रारदार यांचे लाचेच्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात येणा-या पडताळणी कारवाईसाठी आम्ही तक्रारदार व पंच यांना आमचे कडील व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ कॅमेरा दाखवुन सदर व्हाईस रेकॉर्ड मध्ये 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे नवीन मेमरी कार्ड टाकले व व्हिडीओ कॅमे-यामध्ये 8 जीबी क्षमतेचे के.डी.एम.कंपनीचे नवीन मेमरीकार्ड टाकले. त्याचे वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर 11/22 वाजता व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ कॅमेरा सुरु करुन सापळा अधिकारी म्हणुन आमचे, तक्रारदार श्री. गणेश चौधरी, पंच क्र.1 श्री. सुभाष शिंदे , पंच क्र. 2 श्रीमती तेजस्वीनी गदादे यांची निवेदने ध्वनिमुद्रीत केली. त्यानंतर व्हिडीओ कॅमेरा व शासकीय व्हाईस रेकॉर्डर बंद करण्यात आला. ती वेळ 11:30 वाजताची होती.
लोकसेवक दत्ता हे तक्रारदार चौधरी यांचेकडे मागणी करत असलेल्या लाचेच्या संदर्भात पडताळणी कारवाईचे अनुषंगाने आवश्यक सूचना देवून तक्रारदार श्री चौधरी व पंच क्र.1 श्री. शिंदे यांना तक्रारदार यांचेकडील दुचाकी होंडा अॅक्टीव्हा क्रमांक एम एच 14 के ई 1985 यावरुन तलाठी कार्यालय खरपुडी बु्, ता खेड राजगुरुनगर जि पुणे येथे पडताळणी कारवाई कामी पाठविण्याचे ठरवण्यात आले.
त्यानतर आमचे सांगणेवरुन पोलीस शिपाई श्री.महामुलकर यांनी तक्रारदार श्री.चौधरी यांचे शर्टच्या आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावुन तो चालु करुन पडताळणीसाठी पंच क्र.1 श्री. शिंदे यांचेसोबत तक्रारदार यांचे दुचाकी वाहन क्र. होंडा अॅक्टीव्हा एम एच 14 के ई 1985 यावरुन रवाना केले . ती वेळ 11.40 वा.ची होती. उर्वरित सापळा पथक हे खेड येथील नाशिक खेड बायपास रोडवरील हॉटेल चतुर्थीच्या अलिकडील रोडलगत असणा-या मोकळया जागेमध्ये थांबून राहिले. तक्रारदार व पंच क्र 1 हे 12:25 वाजताचे सुमारास आम्ही थांबलो होतो त्या ठिकाणी परत आले. त्यावेळी आमचे सांगणेवरुन पोलीस शिपाई महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर आम्ही पंच क्र. 1 श्री. शिंदे यांना गेल्यापासून येईपर्यत काय झाले असे विचारले असता, त्यांनी सांगीतले की, "मी व तक्रारदार असे त्यांचे दुचाकी वाहनावर तलाठी कार्यालय खरपुडी बु ता खेड राजगुरुनगर येथे गेलो असता सदर ठिकाणी चारही बाजुने पत्रा असलेले तलाठी कार्यालय होते व तेथे एक वयस्कर व्यक्ती उपस्थित होते. तक्रारदार यांनी माझे समक्ष त्यांना ऑफीसचे बाहेर बोलविले व तक्रारदार हे लोकसेवक श्री दत्ता यांचेसोबत त्यांनी दिनाक 07/05/2026 रोजी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत बोलु लागले. त्यावेळी लोकसेवक दत्ता यं ानी तक्रारदार यांना लाचेची रक्कम किती दयायची याबाबत स्पष्ट सांगितले नाही. तसेच तक्रारदार यांचे वारसनांेदीच्या प्रलंबित कामाचे अनुषंगाने कोणतीही चर्चा केली नसल्याचे सांगितले. त्यावेळी कार्यालयामध्ये *ग्राममहसुल अधिकारी /तलाठी मनिषा माने हजर असल्याचे* सांगितले. परंतु तक्रारदार यांनी त्यांचेकडेही कामाचे अनुषंगाने व पैशाचे अनुषंगाने कोणतेही बोलणे केले नसल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. चौधरी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनीही वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. तसेच आम्ही व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन ऐकले असता वरील प्रमाणे प्रलंबीत काम व लाचेच्या रक्कमेबाबत स्पष्टता निष्पन्न झाली नाही. त्याबाबत झालेले संभाषण सविस्तर पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे."
लाच मागणी पडताळणी वेळी प्रलंबित वारसनोंदीबाबत कोणतीही चर्चा न झाल्याने तसेच लाच रकमेच्या ठराविक रकमेबाबत स्पष्टता नसल्याने व सदरवेळी लोकसेविका श्रीमती माने यांचेकडे पडताळणी न झाल्याने लाच मागणी



Scanned with CamScanner

पडताळणी पुन्हा करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. याकरीता तक्रारदार व पंचांना पुन्हा सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पोलीस शिपाई महामुलकर यांनी आमचे सांगणेवरून तक्रारदार यांनी घातलेल्या शर्टच्या अतिल बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावुन तो सुरु करुन पडताळणीसाठी पंच क्र.1 श्री. शिंदे व तक्रारदार यांना त्यांचे दुचाकी वाहन क्र. होंडा अॅक्टीव्हा एम एच 14 के ई 1985 यावरुन रवाना केले. ती वेळ 13:11 वा.ची होती. उरवेरित सापळा पथक व पंच क्र 2 हे आहे त्याच ठिकाणी थांबुन राहिले.
काही वेळाने तक्रारदार श्री. चौधरी व पंच क्रमाक 1 श्री. शिंदे हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आले. त्यावेळी पोलीस शिपाई महामुलकर यांनी आमचे सांगणेवरून तक्रारदार यांना लावलेला व्हॉईस रेकॉर्डर बंद केला, ती वेळ 13.57 वा. ची होती. त्यानंतर पंच क्र.1 श्री सुभाष शिंदे यांना आम्ही घडलेल्या हकीकतीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, तक्रारदार व आम्ही लोकसेवक यांचे कार्यालय निमगाव सजा याठिकाणी पोहोचलो त्यावेळी लोकसेविका श्रीमती माने हया त्यांचे कार्यालयामध्ये हजर होत्या त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना त्यांची वारसनांेद लावली का याबाबत विचारणा केली. त्यावेळी माने मॅडम तक्रारदार यंाना म्हणाल्या दत्तोबा बोललेत तुमच्या कामाबद्दल, गणेशला त्रास देवु नका म्हणुन त्यावेळी तक्रारदार श्रीमती मनिषा माने यंाना दत्तोबा काल भेटले त्यावेळी त्यंानी सहा हजार रुपये दया असे सांगितले असुन त्यामध्ये थोड कमी जास्त होईल की असे मॅडमना विचारले त्यावेळी दोघांमध्ये चर्चा होऊन माने मॅडम यांनी तक्रारदार यंाना पाच हजार पाचशे रुपये लाचेची मागणी केली तसेच लाच रक्कम चार वाजेपर्यत कार्यालयामध्ये घेऊन येण्यास सांगितले. त्यानंतर आम्ही व तक्रारदार श्री चौधरी त्यांचे दुचाकी वरुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री गणेश चौधरी यांना घडलेल्या हकिकती बाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार माझेकडील दुचाकीवरुन निमगाव खंडोबा येथील सजा येथे गेलो. त्यावेळी माने मॅडम कार्यालयामध्ये हजर होत्या. त्यावेळी मी त्यांना "मॅडम आपली वारसनांेद लावली.. का.. ? वारसनांेद लावली का..लावुन दया की मॅडम.. असे म्हणालो. त्यावर माने मॅडम "आता सगळ वारस.. त्यंानी घेतल.. मी काय घेतल का.. मी माझ काम सही करुन रिकामी झाली" असे म्हणाल्या तेव्हा मी माने मॅडम यांना "करुन घ्या तेवढ.. अस काय करताय.. तुमच काय असल ते घ्या.. असे म्हणालो. त्यावर माने मॅडम मला "बोललेत दत्तोबा... झालय बोलण आमच.. सकाळीच.. सकाळी.. हु.. गणेशला त्रास देवु नका म्हणाले" असे म्हणाल्या तेव्हा मी माने मॅडम यांना दत्तोबा "सहा हजार रुपये दया म्हणले.. सहा" असे सांगितले. त्यावर माने मॅडम यांनी मला "हु..मग काय ठरल.." असे विचारले त्यावेळी मी त्यांना "तर मी म्हणल बबा थोड काय कमी होत असल तर देतो म्हणल.." असे म्हणालो तेव्हा माने मॅडम यांनी मला "किती थोड.. दत्ता भाऊ थोड किती कमी..म्हणले.." असे विचारले त्यावेळी मी त्यांना "नाय हा मला म्हणले ना .. हजार रुपये वाढवले त्यांनी.." असे म्हणालो. त्यावर माने मॅडम यांनी मला "हा..सात हजार म्हणले ना.. मग काय झाल.. फायनल तुमच बोलण काय झाल.." असे विचारले. त्यानंतर थोडावेळ आमचेमध्ये चर्चा होऊन माने मॅडम मला "जाऊदया..नका टेंशन घेऊ दत्ता भाऊच्या मनाप्रमाणे काय असल ते करा." असे म्हणाल्या त्यावर मी माने मॅडम यांना "तुमी सांगा" असे म्हणालो त्यावर माने मॅडम मला "फुल नाय फुलाची पाकळी दया अन रामराम ठोका..त्यांना माझा तसा काय विषय नाय.." असे म्हणाल्या. त्यावर मी माने मॅडम यंाना "नाय तुमी.. तुमीच सांगा..तुमी म्हणत असल.." असे म्हणालो तेव्हा माने मॅडम मला "व्होका.. माझ काय असेल ते दया.. सर्कलच काय असल ते दया.. दत्ता भाऊंचे पाचशे हजार रुपये त्यांना चहा पाण्याला देवुन ..विषय क्लोज करुन टाका..जास्त पसारा नका वाढवु" असे म्हणाल्या.. त्यावर मी माने मॅडम यांना "तुमच सांगा" असे म्हणालो त्यावर माने मॅडम यंानी मला हाताची पाच बोटे दाखवुन इशारा केला त्यावेळी मी माने मॅडम यांना ".. पाच... पाच हजार ना.." असे म्हणालो. त्यावर माने मॅडम मला "दत्ता भाऊच.. चहा पाण्याच वेगळ.." असे म्हणाल्या. त्यानंतर थोडावेळ चर्चा होऊन मी माने मॅडम यांना "हाये ना...मग..गोळा करुन आज संध्याकाळपर्यत..देतो..आ..तेच म्हणल मी मॅडमशी पहिल बोलाव बुआ.." असे म्हणालो त्यावर माने मॅडम मला "तुमी दत्ता भाऊ पसन कागद घेऊन माझ्याकड.. दया .. पाकीट बी माझ्याकड..दया.. तुमाला उदया वारस ठराव उदया देते मंजुर.. कसा करायच न कसा नाय.. पण दत्ता भाऊला कागद देताना पाचशे रुपये दया..आगोदर हाताव" असे म्हणाल्या. त्यावर मी माने मॅडम यांना "तुमच्याकड..देवु का त्यंाच्याकड..दिवु." असे विचारले. त्यावर माने मॅडम मला "नाय माझ्याकड..दया.. त्यांच त्यांच चहा पाणी दया ना त्यांना.." असे म्हणाल्या. त्यावर मी माने मॅडम यांना "अच्छा.. सगळ एकदमच देतो ना.. तुमच्याकड.. तुमी देतान.." असे विचारले. व एवढ ठिके ना असे म्हणालो त्यावेळी माने मॅडम मला "पाच हजार..पाचशे.. तुमाला काय करायचे ते करा.. वेळ ठरल्याल्या वेळेमध्ये सगळी काम होत असत्यात.." असे बोलुन पाच हजार पाचशे रुपयाची लाच मागणी केली. असल्याची हकीकत सांगितली. तसेच व्हाईस रेकॉर्डरमधील संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले तेव्हा लोकसेविका मनिषा माने यांनी तक्रारदार यांच्या वडीलोपार्जित जमिनीच्या उता-यावर वारसनोंद करण्याकरीता स्वत:साठी 5000/- व लोकसेवक दत्तात्रय चव्हाण पद कोतवाल यांचेकरीता 500/- रुपये अशी एकत्रित



Scanned with CamScanner

5500/- लाचेची मागणी केली व लाच रक्कम सायंकाळ पर्यत घेऊन येण्यास सांगितले त्यामुळे पुढील सापळा कारवाई करण्याचं सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यानंतर आम्ही सापळा पथकातील चालक पो शि कदम यंाचे मदतीने शासकिय वाहनामध्ये तक्रारदार गणेश चौधरी, दोन्ही पंच यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवुन सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना तक्रारदार पंच क्र 1 व 2 तसेच सापळा पथकास दिल्या. याबाबत सविस्तर पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही लाच रक्कम देणेकामी तक्रारदार गणेश चौधरी यांनी त्यांचे बचतीमधुन सादर केली. आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या भारतीय चलनातील 500 रु. दराच्या 11 नोटांचे नंबर मपोशि शेटे यांनी एका को-या कागदावर लिहुन घेतले. त्याचे सविस्तर वर्णन पंचनाम्यामध्ये नमुद आहे. लाच रक्कम रूपये 5500/- (रूपये 500/- दराच्या 11 भारतीय चलनी नोटा) यांना पोशि /4337 चालक कदम यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावली. तसेच पोशि.कदम यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार चौधरी यांनी घातलेल्या पांढ-या रंगाच्या शर्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. व आमचेसुचनेवरुन पोशि कदम यांनी स्वच्छ पाण्याने हात धुतले.

त्यानंतर सापळापुर्व निवेदन घेण्याकरीता सापळा पथकाचे मदतीने व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर सुरू चालू केला. ती वेळ 14:50 वाजताची होती. त्यामध्ये प्रथम आमचे व तक्रारदार गणेश चौधरी त्यानंतर पंच क्र.01 श्री. शिंदे व पंच क्र.02 श्रीमती गदादे यांचे निवेदन घेतले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर व व्हिडीओ रेकॉर्डर बंद केला. त्यावेळी 14/59 वाजले होते.

त्यानंतर तक्रारदार चौधरी यांचे शर्टचे आतील बनियला सापळा कारवाईसाठी व्हाईस रेकाॅडर लावुन तो चालु करून तक्रारदार व पंच क्र 1 शिंदे यांना त्यांचे वर नमुद दुचाकीवरुन तलाठी कार्यालय, खरपुडे बुद्रुक ता खेड राजगुरुनगर येथे पाठविण्यात आले. ती वेळ 15:06 वाजताची होती. त्यांचे पाठोपाठ आम्ही सापळा पथकासह शासकीय वाहनाने कोणसही संशय येणार नाही असे निघालो. त्यानंतर निमगाव तलाठी कार्यालयाचे परिसरामध्ये विखरुन थांबलो.

काही वेळाने तक्रारदार गणेश चौधरी यांनी सापळा पथकाला उजव्या हाताची दुमडलेली बाही सरळ करुन लाच रक्कम स्वीकारलेचा पुर्वनियोजित इशारा केला त्यावेळी आम्ही सापळा पथक व पंच क्र.2 असे निमगाव तलाठी कार्यालयात गेलो. त्यावेळी पोशि महामुलकर यांनी तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. ती वेळ 15:40 वाजताची होती. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. चौधरी यांना पंचासमक्ष लाच रक्कम कोणी स्वीकारली अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी लोकसेविका माने मॅडम यांनी उजव्या हाताने लाच रक्कम स्वीकारुन टेबलावर ठेवल्याचे सांगितले. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेविका माने आणि लोकसेवक दत्ता शिपाई यांना आमची ओळख सांगुन त्यांचेविरुद्ध झालेल्या सापळा कारवाईची माहिती दिली. तसेच दोघांना त्यांचे नाव व पुर्ण पत्ता याबाबत विचारणा केली असता श्रीमती माने यांनी त्यांचे नाव श्रीमती मनिषा साहेबराव माने वय 45 वर्षे, पद ग्राम महसुल अधिकारी सजा निमगाव तलाठी कार्यालय रा. 107, उमादर्शन सोसायटी, वाडा रोड, राजगुरुनगर खेड, ता. खेड जि. पुणे आणि लोकसेवक दत्ता यांनी त्यांचे नाव श्री. दत्तात्रय छबु चव्हाण वय 59 वर्षे, पद महसुल सेवक निमगाव तलाठी कार्यालय, रा. खरपुडी बु. ता. खेड जि. पुणे असे सांगितले.

त्यानंतर आम्ही पंच क्रमांक 1 श्री शिंदे याना लोकसेविका माने यांनी लाच रक्कम कोठे ठेवली यांबाबत विचारणा केली असता त्यांनी लोकसेविका माने मॅडम यांनी उजव्या हाताने लाच रक्कम स्वीकारुन टेबलावर ठेवल्याचे सांगितले. त्यावेळी आमचे सुचनेप्रमाणे मपोशि शेटे यांनी व्हिडीओ रेकॉर्डर सुरू करुन तलाठी कार्यालयातील बल्ब बंद करुन कृत्रीम अंधार केला तेव्हा लोकसेविका माने यांना, आम्ही आमचे स्वत:चे व त्यानंतर सापळा पथकाचे व पंच 01 यांचे हाताची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता कुठलीही चकाकी दिसुन आली नाही. त्यानंतर पंचासमक्ष आम्ही लोकसेविका माने यांच्या हाताची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे बोटांचे पे-यांवर अॅथ्रॅासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. तसेच टेबलावर ठेवलेल्या लाच रक्कमेची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता लाचरक्कमेवर व टेबलावर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. तेव्हा आम्ही दिलेल्या सुचनेवरुन पंच क्र.2 गदादे यांनी लाच रक्कम ताब्यात घेवून सदर नोटांवरील नंबर व सापळापुर्व कारवाई दरम्यान नोटांचे नंबर लिहून दिलेला कागदावरील नंबरशी तपासून पाहिले असता तंतोतंत जुळून आले. पंच क्र.2 श्रीमती गदादे यांचे दोन्ही हाताची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशामध्ये तपासणी केली असता श्रीमती गदादे यांचे तळहातांवर तसेच बोटांचे पे-यावर अँथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. त्यानंतर तक्रारदार श्री. चौधरी यांना कार्यालयामध्ये बोलवुन त्यांची अल्ट्राव्हायोलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताचे बोटांचे पे-यांना व परिधान केलेल्या



Scanned with CamScanner

शर्टाचे पुढील बाजुचे खिशाचे कडांना व आतमध्ये अॅन्थ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. लोकसेविका माने यांचेकडून लाच रक्कम हस्तगत करतेवेळी वेळीच्या घटनेचे मपोशि कोमल शेटे यांनी त्यांचेकडे दिलेल्या शासकीय व्हिडीओ कॅमे-यामध्ये व्हिडीओ रेकॉर्डिंग केले आहे. त्यानंतर आम्ही तक्रारदार यंाना सापळा कारवाईवेळी घडलेल्या हकिकतीबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगीतले की, मी व पंच क्र.1 असे निमगाव येथील तलाठी कार्यालय येथे गेलो त्यावेळी कार्यालयामध्ये लोकसेवक दत्ता चव्हाण व लोकसेविका श्रीमती माने मॅडम हया हजर होत्या त्यावेळी मी लाच रक्कम लोकसेवक चव्हाण यांचेसमोर धरली असता लोकसेवक चव्हान मॅडमकड दया असे म्हणाले म्हणुन मी लाच रक्कम माने मॅडम यांचेसमोर धरली असता त्यांनी ती उजव्या हाताने स्विकारुन टेबलावर ठेवली त्यावेळी मी त्यांना "मॅडम ऐका तुमी सांगीतल त्याप्रमाण .. आपुण केलय..चहापाण्याच अन त्यांच्या कागदाच.." असे म्हणालो. त्यानंतर आमचेतील चर्चेदरम्यान माने मॅडम मला "तुमच प्रकरण उदया अपडेट होईल" असे म्हणाल्या त्यानंतर मी सापळा पथकास ठरल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारले बाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर आम्ही पंच क्र.1 यांना घडलेल्या हकिकतीबाबतच विचारले त्यावेळी त्यांनीसुध्दा तक्रारदार यांचेप्रमाणेची हकिकत सांगितली. सदरबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.
तरी तक्रारदार श्री गणेश चौधरी यांचे वडिलोपार्जित जमिनीचे वारसनोंद करण्याकरता दिंनाक 08/05/2026 रोजी 11/40 ते 15/40 वाजेच्या दरम्यान ला.प्र.वि.पुणे विभाग यांचेमार्फतीने करण्यात आलेल्या पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री दत्तात्रय छबु चव्हाण वय -59 वर्षे, पद – कोतवाल / महसुल सेवक नेमणुक ग्राममहसुल कार्यालय निमगाव, निमगाव सजा अंतर्गत गावे मौजे निमगाव/ खरपुडी बुद्रुक, ता खेड राजगुरुनगर जि पुणे. यांनी स्वत:करीता व लोकसेविका मनिषा माने यांचेकरीता 5000/- रुपये व ऑनलाईन फीचे 500/- रुपये सांगुन 5500/- रुपयाची मागणी केली. तसेच लोकसेविका मनिषा माने, पद ग्राम महसुल अधिकारी, नेमणुक ग्राममहसुल कार्यालय निमगाव, निमगाव सजा अंतर्गत गावे मौजे निमगाव/ खरपुडी बुद्रुक, ता खेड राजगुरुनगर जि पुणे यांनी स्वत:करीता 5000/-रुपये व लोकसेवक दत्तात्रय चव्हाण, पद कोतवाल नेमणुक ग्राममहसुल कार्यालय निमगाव, निमगाव सजा अंतर्गत गावे मौजे निमगाव/ खरपुडी बुद्रुक, ता खेड राजगुरुनगर जि पुणे यांचेकरीता 500/- रुपये असे एकत्रित 5500/- रुपये लाचेची पंचासमक्ष मागणी करुन ती मोौजे निमगाव खंडोबा येथिल ग्राम महसुल कार्यालय निमगाव येथे पंचांसमक्ष स्वीकारली म्हणुन लोकसेविका मनिषा साहेबराव माने व लोकसेवक दत्तात्रय छबु चव्हाण यांचेविरोधात भ्रष्टाचार प्रतिबधक कायदा 1988 चे कलम 7, 12 प्रमाणे अपराध केला आहे. म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.
माझा वरील जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून, तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Subhash Sadashiv Chavan(I (Inspector)) / 000000000000 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Subhash Sadashiv C
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 000000000000

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner